REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 8 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2019

# प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे विदर्भातील रोजगार निर्मिती: एक अध्ययन

डॉ. राधेश्याम ना. मानकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, जवाहर नगर, भंडारा

**सारांश**

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकी संबंधी उपरोक्त बाबी लक्षात घेता महाराष्ट्रातील विदर्भ विभागात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीची काय अवस्था आहे हे समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण या विदर्भात या क्षेत्रात कोणतेही संशोधन कार्य अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे या संबंधीची माहिती केवळ कागदोपत्री उपलब्ध असून केवळ कार्यालयीन उपयोगाची ठरलेली आहे. या माहितीचा उपयोग योजनाकारांनी विदर्भाच्या विकासा करीता करून घ्यावा तसेच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा वापर इतर गरजूक्षेत्रांमध्ये देखील करण्यात यावाण या हेतूने प्रस्तूत संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे. अध्ययनातील माहितीचा उपयोग प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीसंबंधी जनसामान्य व लाभार्थ्यांची जागरूकता तपासण्याकरीता होऊ शकेल तसेच या क्षेत्रात इतर अवसरे शोधण्यात मदत होऊ शकेल हे या प्रमाणे प्रस्तूत संशोधन महत्वपूर्ण ठरू शकेल.




**प्रस्तावना**

कोणत्याही राष्ट्राच्या विकासामध्ये विदेशी भांडवलचा सर्वच देश स्विकार करीत असतात. मागासलेले आणि विकसनशील देश विदेशी भांडवलाच्या माध्यामातून कमीत—कमी वेळेत यशस्वीरित्या देशाचा आर्थिक विकास करण्यात यश प्राप्त करतात. विश्वातील सर्वच राष्ट्रांनी त्यांच्या सुरुवातीच्या काळात विदेशी भांडवलाचा मदत घेतली आहे. संयुक्त राज्य अमेरिका, जपान, आणि रशिया हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे.

विकसनशील देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिकरणाची भुमिका फार महत्वाची आहे. विकसित, अर्धविकसित आणि विकसनशील देशाच्या प्रतिव्यक्ति उत्पन्नात आढळून येणाऱ्या तफावतीचे मुख्य कारण त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या संरचनेत आढळून येतो. विकसित देशाची अर्थव्यवस्था ही उद्योगप्रधान अर्थव्यवस्था आहे तर बहुतांश विकसनशिल देशाच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रियाचा मोठ्या प्रमाणात कृषीशी सबंध येतो. भारतात देखिल कृषीशी निगडित असलेले कुटिर आणि लघु उद्योगांचे प्राबल्य अर्थव्यवस्थेत होते.

विदेशी गुंतवणूक ही आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. ज्यावेळी अंतर्गत बचत कमी असते. तेव्हा बाह्य बचतीचा (विदेशी गुंतवणुक) उपयोग केला जातो. विदेशी गुंतवणूक ही सरकारी प्रतिभूती, रोखे, शेअर, म्युच्युअल फंड आदींमध्ये होत असते. तसेच एखादा गुंतवणूकदार प्रत्यक्षात उत्पादन कार्यात गुंतवणूक करतो. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादनाला प्रोत्साहन मिळते. त्यामुळे रोजगार, उत्पादनात वाढ होते.

भारतात १९९१ च्या औद्योगिक धोरणामुळे विदेशी गुंतवणूकीला चांगली चालना मिळाली आहे. या धोरणामुळे ५१ टक्के गुंतवणूकीस भारत सरकारने परवानगी दिली. या उदार धोरणामुळे मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह भारतीय अर्थव्यवस्थेकडे वळला आहे. विदेशी गुंतवणूकीमध्ये दोन प्रकारची गुंतवणूक होते. एक म्हणजे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही प्रत्यक्ष उत्पादन कार्यात केली जाते. ज्यामुळे उत्पादन, उत्पन्न, रोजगार यामध्ये वाढ होते. दुसरी गुंतवणूक म्हणजे परकीय संस्थात्मक गुंतवणूक ही गुंतवणूक प्रामुख्याने शेअर बाजारामध्ये केली जाते. शेअर बाजारातील गुंतवणूक ही काही

काळासाठी असते. परंतु प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही कायम स्वरूपाची असते. म्हणून भारत सरकारने या दोन्ही गुंतवणूकीपैकी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस अधिक प्रमाणात प्रोत्साहन दिले आहे.

**सारणी क्रमांक १: प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होण्याबाबत उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया**

| उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया | जि. उ. कर्मचारी | | मजूर | | बेरोजगार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सं | टक्के | सं | टक्के | सं | टक्के | सं | टक्के |
| पूर्णत: सहमत | ८० | ३३.३ | २२ | ९.२ | २१ | ८.८ | १२३ | १७.१ |
| सहमत | ७१ | २९.६ | ३६ | १५.० | ३४ | १४.२ | १४१ | १९.६ |
| तटस्थ | ४२ | १७.५ | ४२ | १७.५ | ५१ | २१.३ | १३५ | १८.८ |
| असहमत | २६ | १०.८ | ७९ | ३२.९ | ८३ | ३४.६ | १८८ | २६.१ |
| पूर्णत: असहमत | २१ | ८.८ | ६१ | २५.४ | ५१ | २१.३ | १३३ | १८.५ |
| **एकूण** | **२४०** | **१००** | **२४०** | **१००** | **२४०** | **१००** | **७२०** | **१००** |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होण्याबाबत उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होण्याबाबत १७.१ टक्के उत्तरदाते पुर्णत: सहमत असून, १९.६ टक्के उत्तरदाते सहमत असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे १८.८ टक्के उत्तरदाते गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होण्याबाबत तटस्थ असून या विधाना संबंधी असहमत व पुर्णत: असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी क्रमश: २६.१ टक्के व १८.५ टक्के होती. कार्यानूसार अध्ययन क्षेत्रातील विविध समुहातील उत्तरदात्यांचे गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होण्याबाबत मत वरील सारणी क्रमांक ६.१.१९ मध्ये प्रस्तूत करण्यात आले आहे. या परिणामांवरून असे दिसून येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश उत्तरदाते गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होईल या विधानाशी असहमत आहेत.

**सारणी क्रमांक २: किरकोळ दुकाने वाढत्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असण्याबाबत माहिती**

| किरकोळ दुकाने वाढत्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पूर्णत: सहमत | ४१ | १७.१ |
| सहमत | ३१ | १२.९ |
| तटस्थ | ६४ | २६.७ |
| असहमत | ५८ | २४.२ |
| पूर्णत: असहमत | ४६ | १९.२ |
| **एकूण** | **२४०** | **१००** |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये किरकोळ दुकाने वाढल्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असण्याबाबत उत्तरदात्यांची प्रतिक्रीया दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार किरकोळ दुकाने वाढल्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असण्याबाबत १७.१ टक्के उत्तरदाते पूर्णत: सहमत असून, १२.९ टक्के उत्तरदाते सहमत असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे २६.७ टक्के उत्तरदाते किरकोळ दुकाने वाढल्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असण्याबाबत तटस्थ असून या विधाना संबंधी असहमत व पुर्णत: असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी क्रमश: २४.२ टक्के व १९.२ टक्के होती. अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांचे किरकोळ दुकाने वाढल्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असण्याबाबत मत वरील सारणी क्रमांक ६.२.२८ मध्ये प्रस्तूत करण्यात आले आहे.

## निष्कर्ष

- त्यामुळे विदर्भ प्रदेशाचा मोठ्या प्रमाणात औद्योगिक व आर्थिक विकास झालेला आहे. विदर्भात उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे या विदर्भातील नागरिकांचा राहणीमानाचा दर्जादेखील उंचावलेला आहे.
- विदर्भातील बहुतांश नागरीकांच्या मते प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होईल.

- विदर्भातील बहुतांश उद्योजकांच्या मते किरकोळ दुकाने वाढल्यामुळे बऱ्याच प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१) चव्हाण एन. एल. (२००५), आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, पुणे, पृष्ठ क्र. १६७

२) दत्त रूद्र एवं सुन्दरू के.पी. एम., (२००७) भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, पृ. क्र. १२६, १२७.

३) दत्त रुद्र एवं सुन्दरम के. पी. एम., (२००७) भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, पृ. क्र. १२६, १२७, १२८.

४) दत्त रुद्र एवं सुन्दरम के. पी. एस., (२००७) भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, पृ. क्र. २७६.

५) दत्त रुद्र एवं सुन्दरम के. पी. एस., (२००७) भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, पृ. क्र. २७६.

६) दत्त रुद्र, सुन्दरम के. पी. एम. (२००७) भारतीय अर्थव्यवस्था एस. चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, नई दिल्ली. पृ. क्र. २७५.

७) दत्त रूद्र व सुंदरम्, के.पी.एम्. (२००७), भारतीय अर्थ व्यवस्था, एस्. चांद पब्लिकेशन कंपनी नवी दिल्ली.

८) देशमुख व वनमाळी (१९७१), भारतीय औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर

९) महाजन धनश्री (२००५) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

१०) मिश्र कुमार अरविन्द, (कुरूक्षेत्र), जनवरी २००७, विशेष परिचय और संभावनाएँ.

११) पाटील, जे. एफ., पठाण, के. जी., ताम्हणकर, पी. जे. व यादव, एस. बी., (२०१२), अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंड ओळख, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

१२) पुरोहित वसुधा (२००५), विकास व पर्यावरणाचे अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. पृ. क्र. ५०—५८.

१३) प्रतियोगिता दर्पण, (२००७), भारतीय अर्थव्यव्था, पृष्ठ क्र. १७४—१७५

१४) प्रतियोगिता दर्पण, (२००७), भारतीय अर्थव्यवस्था, पृष्ठ क्र. १८४

१५) प्रतियोगिता दर्पण, (२००८), भारतीय अर्थव्यवस्था, पृ. क्र. १७८.

१६) प्रतियोगिता दपर्ण, (२००८), भारतीय अर्थवस्था, पृ.क्र. १८५.

१७) प्रतियोगितपा दर्पण, (२००८), भारतीय अर्थव्यवस्था, पृ. क्र. १८३

१८) बोधनकर, सु., अलोणी, वि. व कुलकर्णी, मृ., (१९९३), सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, पहिली आवृत्ती, पृ.क्र.२९९